**आदरांजली**

# एक होती रजनी...

भारती गोरे

मार्च महिन्याचा अखेरचा दिवस जाता-जाता रजनी तिलक यांना घेऊन गेला. लढवय्या रजनी गेल्या. फार आजारी वगैरे नव्हत्या पण कोणापुढेही, कधीही न झुकलेल्या रजनींनी मृत्युपुढे मान तुकवली. मध्यरात्र उलटून गेल्यावर मोबाईलवर रजनींच्या निधनाचा मेसेज आला तेव्हा दुःख, हताशा या भावनांहून अधिक तीव्रपणे मनात दाटलेली भावना ही की, दलित स्त्रीवादाचा आधारस्तंभ हरपला.

'मी सर्वप्रथम बाई आहे, मग दलित आहे-मी एक दलित बाई आहे' असं ठणकावून सांगून डाव्या-उजव्या, दलित-सवर्ण सर्वांशी आपल्या स्त्रीत्वाच्या अस्मितेसाठी लढणाऱ्या रजनी गेल्या.

माझी आणि रजनींची नेमकी ओळख कधीची, ते आता नीट आठवत नाही पण साधारणपणे १८-२० वर्षापूर्वी आम्ही भेटलो. आमच्या वयात असलेल्या २०-२२ वर्षांच्या अंतराचा आब राखत मी त्यांना 'रजनी जी' म्हणायला सुरूवात केली तेव्हा ''हम कलम के धागे से बंधी सखियाँ हैं। 'जी' लगाकर पराया मत करो,'' असं रजनींनी सांगितलं तेव्हा 'रजनी जी' मधील 'जी' गळून पडला आणि एक निखळ मैत्रीचं नातं सुरू झालं.

जबाबदाऱ्या पेलणं रजनींनी न कळत्या वयापासून सुरू केलं. मानसिकदृष्ट्या खचलेल्या आईचा संसार रजनींनी स्वतःच्या खांद्यावर वाहिला. जुन्या दिल्लीत एक दर्जी (शिंपी) परिवारात जन्मलेल्या रजनींनी शिवणकाम, हिंदी-इंग्रजी टायपिंग, लिफाफे बनवणं अशा एक न अनेक कामांतून कवडी-कवडी जमवली आणि भावा-बहिणींना उभं करण्यासाठी खर्च केली. अर्थात् पुढे ही सगळी 'आपली' मानलेली मंडळी स्वतःच्या स्वार्थाबरहुकूम यथोचित कारणं देत दुरावली. एकट्या बाईच्या वाट्याला हमखास येणारं नात्यांचं हे फाटकेपण रजनीच्याही वाट्याला आलं. पण खचतील तर त्या रजनी कसल्या? रजनींना फारसं शिकता आलं नाही म्हणजे तथाकथित कागदी पदव्या त्यांच्याकडे नव्हत्या पण अनुभवाच्या विद्यापीठाने त्यांना खूप काही शिकवलं-घडवलं. शिवणकाम शिकवणाऱ्या कॉलेजात तिथं चाललेल्या भेदभावाविरूद्ध त्यांनी पहिला लढा दिला. एक भलं थोरलं पत्र त्यांनी संस्थेला लिहिलं आणि जागोजागी वाटलं- चिकटवलं. त्याचे परिणाम तर भोगावेच लागणार- रजनींना सांगून नापास केलं गेलं. याच काळात रजनी डाव्या चळवळीकडे वळल्या. तिथे राहून बऱ्यापैकी कामही केलं पण कित्येक आपल्या-परक्या मुद्द्यांवर कडकडून लढणारी ही डावी मंडळी बायकांच्या प्रश्नांबाबत काहीच का बोलत नाहीत,

लेखिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये हिंदीच्या प्राध्यापक आहेत.
ई-मेल drbharatigore@gmail.com

हा विचार आत कुठेतरी उगवत-वाढत होता. मग त्या दिल्लीत स्त्री मुक्ती आंदोलनाचं काम करणाऱ्या पहिल्या संस्थेत- 'सहेली'मध्ये दाखल झाल्या. इथेही काम करताना ही संघटना बरीच कामं करते पण जाती सारख्या भयंकर प्रश्नावर गप्प का, हा विचार त्यांना त्रस्त करू लागला. त्यामुळे रजनी इथेही फार रमल्या नाहीत. पण अशा संघटना, चळवळींनी त्यांच्या व्यक्तिमत्वाला मात्र आकार दिला होता. बामसेफ, दलित चळवळ यातून पुढे त्या कांशीराम, मायावती यांच्या संपर्कात आल्या. त्यांच्या सोबत खांद्याला खांदा लाऊन काम करताना पुन्हा प्रश्नांचा किडा मन कुरतडू लागला. एवढ्या जोमाने काम करीत असलेली ही मंडळी पण यांच्या वर्तुळात स्त्रियांना का स्थान देत नाहीत? हा प्रश्न त्यांनी थेट कांशीराम यांच्यापुढेच मांडला. त्या प्रश्नास ''अगं, थोडं थांब, आधी आम्हाला तर उभं राहू दे. थोडं स्थिर होऊ दे मग या संदर्भात नक्की विचार करू'' असं सकारात्मक उत्तर कांशीराम यांनी दिलं. मायावतींनी मात्र रजनींची ही मागणी केवळ धुडकावूनच लावली नाही तर रजनींनाच उपदेश दिला की, तू बायकांचं काम करण्याच्या नादी लागशील तर कधीच पुढे जाऊ शकणार नाहीस. रजनी यांमुळे व्यथित झाल्या. आपली ही व्यथा त्यांनी पुढे कित्येक इंटरव्ह्यू, कथा, कविता यांतून मांडली. यातूनच त्यांनी 'दलित की बेटी' कविता लिहिली. पण बामसेफशी १९७८पासून जोडले गेलेले संबंध मात्र यामुळे विरत गेले.

याच काळात त्यांचा महाराष्ट्राशी संबंध आला. सावित्रीबाई फुल्यांची पुस्तकं त्यांच्या वाचनात आली. उत्तर भारतात सावित्रीबाईंची ओळख महात्मा ज्योतिराव फुल्यांची पत्नी एवढीच होती. पण सावित्रीबाईंचं काम, लेखन, विचार यांमुळे रजनी अक्षरशः त्यांच्यावर फिदा झाल्या व १९९०पासून त्यांनी सावित्रीबाईंवर काम सुरू केलं. सावित्रीबाईंनी बहुजनांसाठी, खास करून सर्वच वर्गा-वर्णातील स्त्रियांसाठी केलेलं काम पाहून रजनी असं काही भारावून गेल्या की, त्यांचं हे भारावलेपण अखेरपर्यंत टिकलं.

(आमच्या दोस्तीतील एक पक्का धागा हा की मी महाराष्ट्रीय आहे आणि दुसरा धागा, ज्यावर रजनी जाम खुश होत्या, तो हा की माझा वाढदिवस ३ जानेवारी अर्थात् सावित्रीबाईंच्या जयंतीदिनी आहे.) सावित्रीबाई त्यांच्या श्वासाश्वासात होत्या. त्यामुळे त्यांनी 'सावित्रीबाई फुले समग्र'चं संपादन-कार्य हाती घेतलं. पण यातूनही त्यांना आणखी एक चटका लावणारी गोष्ट घडली. काही जवळच्याच लोकांनी ''तू सावित्रीबाईंवर काम का करतेस? त्या ओबीसी आहेत. त्यापेक्षा तू रमाबाईंवर काम कर'' असा अनाहूत सल्ला दिला आणि हा न मानल्यामुळे पुन्हा एकदा रजनीच वाईट ठरल्या. त्या सांगत की, बाई कोणत्या जाती वा धर्माची आहे यापेक्षा अधिक ती 'बाई' आहे, हे माझ्यासाठी महत्त्वाचं. पण स्त्री अस्मितेला अशा प्रकारे वाहून घेतलेल्या रजनींना कोण समजून घेणार? त्यापेक्षा त्यांना हट्टी, स्पष्टवक्त्या असं लेबल चिकटवून मोकळं होणाऱ्यांची संख्या खूप जास्त होती.

रजनींचं काम चौफेर चालू होतं. अंगणवाडी युनियन, 'अखिल भारतीय दलित लेखिका संघा'ची स्थापना, 'अखिल भारतीय आंगनवाडी वर्कर एवं हेल्पर युनियन', कविता, कहानी, आत्मकथा, लेखन, अभिमूक-नायकत्वचं संपादन, आव्हान दलित थिएटर आणि इतर ही बरंच काही... रजनींनी 'आरक्षण के भीतर आरक्षण' ही मोहीम सुरू केली. महिला आरक्षणांतर्गत दलित-आदिवासी महिलांना आरक्षण मिळवायचेच पण ओबीसी महिलांचा त्यातील कोटा निश्चित करण्यासाठी त्यांची लढाई सुरू झाली. या लढ्यासाठी ग्रामसभा घेतल्या जाव्यात कारण आरक्षित वर्गाच्या महिलांची बरीच मोठी संख्या खेड्यांतून राहते, असं म्हणून त्यांनी तळागाळातून काम सुरू केलं. उत्तर भारतात स्त्री विरोधी अशा किमान ५० घटनांची फॅक्ट फाइंडिंग करणाऱ्यांत रजनी प्रमुख होत्या. सवर्ण मानसिकतेने ग्रासलेल्या स्त्री आंदोलनावर त्या विखारी

टीका करीत पण कित्येकदा त्यांनी स्वतःवरही जीवघेणी टीका केला आहे. नागपूरात एका संमेलनात वेश्याव्यवसायास कायद्याने मान्यता देण्याची मागणी केली जात होती. रजनींसकट इतर कित्येक दलित महिलांनी त्यांस विरोध केला खरा पण दुसऱ्या बाजूवर विचार करून खरमरीत मत मांडणार नाही तर त्या रजनी कसल्या? ''वेश्यांसाठी जेवढं काम डाव्या आघाडीतील कार्यकर्त्या करतात किंवा त्यांस कायद्याने मान्यता देण्याची मागणी करणाऱ्या महिला करतात तेवढं काम दलित महिला संघटना करीत नाहीत. आपण त्यांच्याशी 'कनेक्ट' नाही आहोत आणि आपण वेश्यांना, त्यांच्या प्रश्नांना आपल्या 'लिस्ट'मध्ये स्थानही दिलेलं नाही.'' असं बोलून रजनींनी मोठा वाद ओढवून घेतला होता. रजनी आणि वाद यांच 'चोली दामन'चं नातं तयार झालं होतं. एखादी चुकीची घटना घडतेय आणि रजनी निमूट पाहत आहेत (असं निमूट पाहणं त्यांचा कितीही व्यक्तिगत फायदा करून देणारं असलं तरी) असं होणं मुळी अशक्य. रजनी बोलणारच... असं बोलताना सवर्ण-दलित, स्त्री-पुरुष असं कुठलंही बंधन त्या पाळायच्या नाहीत. बोलताना अट केवळ एक- खरं आणि योग्य तेच बोलणार! या अशा बोलण्यामुळे मतभेदाच्या कित्येक प्रसंगांना त्यांना सामोरं जावं लागलं. कमाल म्हणजे समोरच्या व्यक्तीचं म्हणणं पटलं तर रजनी ते खुल्या दिलानं मान्य करीत. विरोध न स्वीकारण्याएवढं मानसिक, बौद्धिक कोतेपण रजनींमध्ये नव्हतं. माझे स्वतःचे रजनींसोबत कित्येकदा मतभेद झाले. पण संवादानंतर लगेच ते मिटलेही.

रजनीच्या नशीबी आलेला एक विकृत वाद म्हणजे एक स्वयंघोषित दलित चिंतक धर्मवीर यांच्यासोबत झालेला वाद (यावर लिहावं की नाही, याबाबत मी दीर्घ काळ विचार करत होते. पण रजनी ज्या प्रसंगास निधडेपणाने सामोरं गेल्या त्या प्रसंगाबद्दल लिहायला ही मी घाबरावं हे योग्य नाही. शिवाय हा प्रसंग म्हणज दलित स्त्रीवादाची व्यावहारिक सैद्धांतिक खूणगाठच... कशी टाळणार?) तर या धर्मवीर नावाच्या वेड्या आय. ए. एस ऑफिसर असलेल्या या स्वयंघोषित दलित चिंतकास हा भ्रम झाला की, रजनी त्यांच्या मुलींना बापाविरुद्ध भडकवतेय, आत्महत्येस प्रवृत्त करतेय आणि रजनी धर्मवीरवर प्रेम करते.

रजनींनी आधी याकडे दुर्लक्ष केलं. रजनींच्याच शब्दात सांगायचं तर- ''और भी गम हैं, और भी काम हैं। केवल धर्मवीर ही नहीं रह गया हमारे पास। धर्मवीर को छोड़कर बहुत-से अधूरे काम हैं मेरे पास, जो मुझे पूरे करने हैं। इसलिए धर्मवीर मेरी प्राथमिकता नहीं।'' पण धर्मवीरने तर रजनीला बदनाम करण्याचा विडाच उचललेला. त्यांनी रजनींना अनेक अत्यंत अपमानास्पद पत्रं लिहिली अन् ती रजनींना न पाठवता मीडियासकट सर्व परिचितांना व दलित आंदोलकांना पाठवून दिली. कोणत्याही स्त्रीचं कंबरडं मोडायचं असेल तर पुरुष, मग तो सवर्ण असो वा दलित, एकच शस्त्र उपसतो- स्त्रीवर चरित्रहीनतेचे आरोप करतो. रजनीच्या चारित्र्यहननाचे प्रयत्न झाले तेव्हा रजनी पन्नाशीत होत्या. हे असे घाणेरडे आरोप ऐकून कुठलीही स्त्री कोलमडून गेली असती. हेमलता महिश्वर तर लेखी म्हणाल्या- ''धर्मवीर ने जिस भाषा का प्रयोग किया है, कोई भी स्त्री भला इसका क्या जवाब दे सकती है? आत्महत्या का सबब है यह'' पण रजनी अन् आत्महत्या? छे! रजनी ने 'ईंट का जवाब पत्थर से' दिला- ''मर्द आखिर अपनी मर्दानगी पर शेखी मारे बिना नहीं रह सकता। औरत उन्हें लुभाने-पटानेवाली मशीन नजर आती है। इसी परंपरा में धर्मवीर ने मुझ पर यह आरोप लगाकर सिद्ध करना चाहा है की, वह कितना मोहक मर्द है।... मैं धर्मवीर को बताना चाहूँगी हमारी दुनिया में उसकी कोई अहमियत नहीं है, वह जिस धर्म और मानसिकता की पैरवी कर रहा है उसमें दलित लेखिकाएं कभी शामिल नहीं होंगी, रजनी तिलक तो कदापि नहीं। हमें राहों को मोड़ना आता है। हमने वापस लौटना नहीं सीखा। हमारी मंजिलें आगे की ओर जाती

हैं। धर्मवीर को, उसकी गलतफहमियों को और उसके मित्रों को भी यह स्पष्ट होना जरूरी है की, वे इतिहास में दलित आंदोलन के विपरीत खडे. नजर आयेंगे। शराब-मीट और मस्तियाँ बहुत सस्ती चीजें हैं। आंदोलन अपनी राह चलता है।'' ऐकतच रहावं असं रजनींचं बेखौफ बोलणं..

रजनीच्या या उत्तराने विरोधकांची बोलती बंद झाली. मी त्यावेळी 'युद्धरत आम आदमी'मध्ये 'पर आदमी कुत्ते को नहीं काटता' लेखात म्हटले होते की 'निःसंदेह ब्राह्मणवादी मानसिकता इस आपसी टकराव के मजे लूट रही है।' मला वाटले की याचा रजनींना राग येईल. शेवटी एका स्त्रीच्या प्रतिष्ठेऐवजी दलित आंदोलनाची स्थिती विचारात घेऊन माझी चूक झाली की काय? पण रजनींनी स्वतःहून फोन करून 'तुझं म्हणणं अगदी खरं आहे पण माझ्या जवळ इतर कुठला पर्यायच नव्हता' म्हणत दुःख व्यक्त केले तेव्हा मलाच लाज वाटली त्यानंतर 'हवा-सी बेचैन युवतियाँ'मध्ये मग रजनीने रीतसर आपला 'स्टँड' मांडला-

कथित दलित साहित्यकारों/तुम्हारी ओछी नजर में स्त्री का सुन्दर होना/उसका 'मैरिट'/सुन्दर न होना उसका 'डीमैरिट'!

सवर्णों की नजर में वे ही है मैरिटवाले/तुम हो डीमैरिट/मैरिट का पहाड़ा उनका जैसा/वैसा ही तुम्हारा,

फिर तुम्हारा विचार नया क्या/कौन-सा सामाजिक न्याय कौन-सा वाद तुम्हारा/जरा सोचकर बताओ

व्यक्तिगत बाबीं पासून प्रेरणा घेऊन व त्यानंतर व्यक्तिगततेस मागे सारून सामाजिक दिशादर्शन करणाऱ्या साहित्यास खरे साहित्य म्हणावयास हवे रजनी अशा सर्वार्थाने खऱ्या साहित्यिक, खऱ्या आंदोलक, खरी कार्यकर्त्या होत्या. त्यांची भूमिका सदैव सर्वव्यापक-सर्वसमावेशक होती पण स्त्रीला दलित मानून मांडणी केलेला हिंदी-दलित स्त्रीवाद निर्विवादपणे रजनींची देणगी! याचा अर्थ रजनींचं आयुष्य निव्वळ तिखट होतं असं नव्हे. त्या पाना फुलावर लिहायच्या, निसर्गावर-प्रेमावर लिहायच्या. मुलगी ज्योति बद्दल बोलतांना निव्वळ 'आई' व्हायच्या.

अशी ही रजनी....तिच्या जाण्यानं प्रत्येक स्त्रीचं मोठं नुकसान झालं आहे. रजनीसारखं मृदुता जपत लढत जगण्याचं बळ एकवटणं, हीच रजनीला खरी श्रद्धांजली ठरेल.

●


परिवर्तनाचा वाटसरू

परिवर्तनाचा वाटसरूची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील

बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे

बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**

बचत खाते क्र. : 051410110013969

आयएफएससी क्र. : BKID0000514

एमआयसीआर क्र. : 411013014

**पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७७७६९०२२६७ या क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा pwatsaru@yahoo.com या ईमेलवर कळवावे.**